**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई**

अधिकृत भागभांडवलाची मर्यादा रु.५०.०० कोटी वरुन रु.२५०.०० कोटी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय, क्रमांक-इमाव-२०१२/प्र.क्र.२८१/महामंडळे

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २१ नोव्हेंबर, २०१२.

वाचा :- १) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ, मर्या. मुंबई यांचे पत्र क्र. इमाविवि-२०१२/भाग भांडवल/९८२, दि. २६/०६/२०१२.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ मर्या. मुंबई या शासन अंगीकृत उपक्रमाची स्थापना दि.२३.०४.१९९९ अन्वये करण्यात येऊन हे महामंडळ कंपनी कायदा १९५६ खाली पंजीकृत झालेले आहे.

२. या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. ५०.०० कोटी आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळामार्फत राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी तसेच, त्यांना स्वयंरोजगारासाठी उद्युक्त करण्यासाठी कर्जाच्या विविध योजना राबविणे व दारिद्रय रेषेखालील व्यक्तींची आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. त्याकरीता निधी उपलब्ध व्हावा म्हणून सध्याच्या मंजूर अधिकृत भागभांडवलात वाढ करण्यासंबंधी प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. आता शासन या निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचे अधिकृत भागभांडवल रु. ५०.०० कोटीवरुन रु. २५०.०० कोटी ( रुपये दोनशे पन्नास कोटी फक्त ) वाढविण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

अ) कर्ज वसुलीचे प्रमाण अत्यल्प आहे ते वाढविण्याची उपाय योजना करावी.

ब) कर्ज वसूलीसाठी विशेष परिश्रम घ्यावेत.

क) कर्ज वसूलीमध्ये समाधानकारक वसूली नसल्यास यापुढे भागभांडवल वितरीत करण्यात येणार नाही.

कृ.मा.प...

हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या औपचारिक संदर्भ क्रमांक ४२२/१२/व्यय-१४, दिनांक २६.१०.२०१२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

-स्वाक्षरित/-
( कि. पां. वडते )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आयुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्या.) मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
वित्त विभाग (का व्यय १४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई.
कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
निवड नस्ती (का-महामंडळे)